# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६०८ दिनांक २३.०७.२०२०

## अर्नाळा पोलीस ठाणे यांचेकडुन विनापरवाना रेती वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई

दि.२२/०७/२०२० रोजी १२.४५ वाजताचे सुमारास यातील आरोपीत नामे १) अमित अनिल विश्वकर्मा, वय २५ वर्षे, व्यवसय-चालक, रा.चंदनसार, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर व आरोपीत क्र. २) विक्रम काशिनाथ मांगेला, वय ३० वर्षे, व्यवसाय- रेती स्प्लाय, रा. आगाशी टेंभीपाडा, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर हे सत्पाळा नाका विरार पश्चिम येथे त्यांचे ताब्यातील ट्रक क्र. एम एच ४८/जे/२८२९ मधुन महाराष्ट्र शासनाचा महसुल चुकवुन पर्यावरणाचा -हास करुन अवैध्य रित्या रेती (गौण खनिज) चोरी करुन वाहतुक करुन घेवुन जात असताना मिळुन आले. सदरचे आरोपीत यांचे ताब्यातुन १) ५,५०,०००/-रु किंमतीचा सहा टायरी ट्रक क्रं.एम एच ४८/जे/२८२९ व २) १५,०००/- रु किंमतीची अंदाजे अडीच ब्रास रेती असा एकुण ५,६५,०००/- रु. किंमतीचा जप्त करण्यात आला असुन सदरचे आरोपीत यांचे ताब्यातुन अर्नाळा पोलीस ठाणे गु.रजि.क्र. २६९/२०२० भादविस कलम ३७९,३४ सह पर्यावरण संरक्षण १९८६ चे १५,१९ व महाराष्ट्र जमिन महसुल १९६६ ४८(७) अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अर्नाळा पोलीस ठाणे येथे सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.महेश शेटये, प्रभारी अधिकारी अर्नाळा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली अर्नाळा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner